| | महाराष्ट्र शासन.<br>उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ,नाशिक.<br>( महाराष्ट्र राज्य ) | |
|---|---|---|

" विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय परीसर " स्व. इंदिरा गांधी चौक,शालिमार,नाशिक. पिन कोड- ४२२ ००१.

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक (कार्यालय) | (०२५३) २५९२२७१ | संकेतस्थळ:-arogya.maharashtra.gov.in |
| उपसंचालक (व्यक्तिगत ) | (०२५३) २५९२२७२ | ई मेल आयडी :- ddhsnsk@rediffmail.com |
| | | माझे कुटुंब - माझी जबाबदारी |
| आरोग्य सेवा<br>महत्वाचे | जा.क्र.उपसंआसे/आस्था-१ब/वै.अ.गट-ब/BAMSकंत्राटी पदभरती/ —— /२०२५ 26710-23<br>दिनांक:- ०३ जून मे, २०२५ | |

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा रुग्णालय, नाशिक/धुळे.
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर.

**विषय :-** सा.आ.विभागाअंतर्गत महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा, गट-ब या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी गट-ब या पदांवर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी म्हणुन बी.ए.एम.एस. (B.A.M.S) अर्हताधारक उमेदवारांकरीता पदभरती करण्याबाबत..

**संदर्भ :-** १) सा.आ.विभाग शासन निर्णय क्रमांक मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३, दि. ०३/१२/२०१८

२) सा.आ.विभाग शासन निर्णय क्रमांक संआसे-२०२२/प्र.क्र.१९२/सेवा-१ (शिकाना), दि. २७/१२/२०२२

३) या कार्यालयाचे पत्र क्र.उपसंआसे/आस्था-१ब/कंत्राटी वै.अ.गट-ब/रिक्त प.मा./४९८२१-३७/२०२२, दि. ३०/१२/२०२२

४) सा.आ.विभाग शासन निर्णय क्रमांक संआसे-१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३ दि. ०७/०३/२०२४

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये वैद्यकिय अधिकारी गट-ब (बी.ए.एम.एस.) यांचे पदाचा आढावा घेऊन रिक्त पदांची माहिती एकत्रित करुन सदर पदभरतीबाबत जाहीरात प्रसिध्द करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. ३ अन्वये या परिमंडळातील सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे अंतर्गत वैद्यकिय अधिकारी गट-ब, पदांचा आढावा घेऊन जाहीरात प्रसिध्द करण्याची कार्यवाही या कार्यालयाचे स्तरावरुन करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र. १ मधील जिल्हा निवडसमिती मार्फत ही निवड प्रक्रिया ही जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत निवड समितीमार्फत करण्याबाबत तरतुद आहे. सबब, आपण समितीचे सदस्य सचिव या नात्यांने सदर प्रक्रिया ही प्राप्त होणाऱ्या उमेदवारांचे अर्ज दिनांक ०५/०६/२०२५ ते दि. १३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत जमा करुन घ्यावे व प्राप्त अर्जाची छाननी संदर्भिय शासन निर्णयानुसार व नमुद करण्यात आलेल्या जाहीरातीनुसार अंतिम मुदत संपलेनंतर उमेदवारांची गुणवत्त यादी प्रसिध्द करुन हरकतींना मुदत देण्यात यावी. हरकतीचे निराकरण करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करावी. सर्व प्रक्रिया निवड समितीच्या अध्यक्षांचे मंजुरीने करावी व अध्यक्षांच्या मंजुरीने समुपदेशन प्रक्रिया पूर्ण करुन निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती

आदेश देण्यात यावे. नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांची यांदी जिल्हयातील जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

सदर निवड झालेल्या उमेदवारांचा करारनामा संदर्भिय शासन निर्णयातील अटी शर्ती मान्य असल्याचा रु. ५००/- चे बंधपत्रावर लिहून घ्यावे व तसेच बंधपत्र जाहीरातीमधील अ.क्र.१२ नुसार उपसंचालक यांचे नावे घेण्यात यावे व तसे बंधपत्र कार्यालयास सादर करावे. सदर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास व सर्व संबंधितांना सादर करावा.

सोबत :- संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली जाहीरात व मुळ अर्जाचा नमुना.

(डॉ. कपिल आहेर)
उपसंचालक आरोग्य सेवा,
नाशिक मंडळ, नाशिक.

प्रत माहितीसाठी सविनय सादर:-

१) मा.कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन सा.आ.वि. मंत्रालय मुंबई. (सेवा-१ शिकाना)

२) मा.संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.

३) मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगाव/अहमदनगर.

# जाहीरात

## उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक

### वैद्यकिय अधिकारी, गट-ब यांची कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र. मवैअ-२०५४/प्र.क्र.२४१(भाग-२)/सेवा-३, दि. ०४/०७/२०१९, शासन निर्णय क्र. मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१ (भाग-१)/सेवा-३, दि. ०३/१२/२०१८ व शासन निर्णय क्र. संआसे-२०२२/प्र.क्र.१९२/सेवा-१ (शिकाना), दिनांक २७/१२/२०२२ व शासन निर्णय मवैअ-१०५४/प्र.क्र.२४१(भाग-१)/सेवा-३, दि. ०७/०३/२०२४ अन्वये मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे आरोग्य सेवा, नाशिक परिमंडळांतर्गत जिल्हानिहाय विविध जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, नगरपरिषद दवाखाने, पोलिस दवाखाने व प्राथमिक आरोग्य केंद्रातील महाराष्ट्र वैद्यकिय आरोग्य सेवा, गट-ब यांची ४३ पदे वैद्यकिय अधिकारी, गट-ब, बी.ए.एम.एस. (B.A.M.S.) म्हणून कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्यांचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

| अ.क्र. | जिल्हा | भरावयाची पदे | |
|---|---|---|---|
| | | जि.प.स्तर | राज्य स्तर |
| १ | धुळे | ६ | १ |
| २ | नाशिक | २५ | २ |
| ३ | नंदुरबार | ६ | ० |
| ४ | जळगांव | १ | ० |
| ५ | अहमदनगर | २ | ० |
| | एकूण | ४० | ३ |

१) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यासाठी किंवा सदर पदावर बी.ए.एम.एस. अर्हताधारक नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तो पर्यंत राहील.

२) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिनेकरीता असल्यांने त्यांना नियमित वैद्यकिय अधिकाऱ्याप्रमाणे म.ना.से.(रजा) नियम लागु राहणार नाही. तसेच ते विमा योजना भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतीही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षीक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

३) सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरुपात असल्यांने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांना धारणाधिकार असणार नाही.

४) कंत्राटी तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची भविष्यात विहीत मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

५) केवळ तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवाराची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणून गणण्यात येणार नाही किंवा सेवा जेष्ठता व कोणत्याही प्रकारच्या सेवा विषयक बाबीसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.

६) निवड झालेल्या कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

१) दोन दिवसापेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.

२) कामामध्ये निष्काळजीपणा

३) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.

४) कामकाज अकार्यक्षम असणे सेवेची कर्तव्य व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळणे.

५) गैरवर्तन/गैरव्यावहार केल्याचे निदर्शनास येणे.

६) कार्यरत पदावर नियमित उमेदवार नियुक्ती झाल्यास.

७) अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

८) निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी मुख्यालयात राहणे बंधनकारक असेल. तसेच त्यांचे बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य आहे.

७) खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या कंत्राटी उमेदवारांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.

१) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता, गैरहजर असलेले व सोडून गेलेले वैद्यकिय अधिकारी.

२) शिस्तभंग कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी

३) अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी.

८) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांनी सेवेत असतांना गैरवर्तन/गैरव्यावहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील व त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

९) सदर कंत्राटी वैद्यकिय अधिकारी यांना सेवा काळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांनी १ महिन्याची नोटीस किंवा १ महिन्याचे मानधन भरुन कार्यमुक्त होता येईल.

१०) कंत्राटी उमेदवारांना १ महिन्याची आगाऊ सुचना देवून संबंधित उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक त्यांना कार्यमुक्त करु शकते.

११) शासन निर्णय क्रमांक संआसे-२०२२/प्र.क्र.१९२/सेवा-१(शिकाना), दि. २७/१२/२०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे नमूद कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांपैकी आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. पात्रताधारकांना दरमहा रु. ४५०००/- व इतर भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. (B.A.M.S.) अर्हताधारकांना रु. ४००००/- इतके एकत्रित मानधन दिले जाईल, तसेच शासन निर्णयात उर्वरीत नमुद अटी व शर्ती बंधनकारक राहतील. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचेशी करावा लागेल.

१२) कंत्राटी स्वरुपात सेवा असल्याने संबंधित पदावर कायम करण्याचा अधिकार त्यांना सांगता येणार नाही, तसेच त्या अनुषंगाने कोणत्याही न्यायालयात जात येणार नाही. अशा आशयाचा करारनामा उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांचेशी करावा लागेल.

१३) उमेदवारांनी मुलाखतीस येतांना सोबत बी.ए.एम.एस. पदवी सर्व वर्षाचे गुणपत्रीका व प्रमाणपत्र व पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र एमसीआयएम नोंदणी व नुतणीकरण प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इत्यादी सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

१४) प्राप्त अर्जाचीसंख्या जास्त असल्यास रिक्त पदांच्या संख्येनुसार १:५ प्रमाणे गुणानुक्रमाणे प्रथम असणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीस बोलाविण्यात येईल. तसेच पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना ५ गुणाधिक्य व शासकीय कामाचा अनुभव असल्यास प्रतिवर्ष २ गुणाधिक्य असतील

१५) सदर रिक्त पदांची संख्या ही कमी जास्त होऊ शकते.

१६) सदर भरती बाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हा निवड समितकडे राखून ठेवण्यात आलेले आहे

शैक्षणिक अर्हता :- **बी.ए.एम.एस. (B.A.M.S.)**

अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण :- दिनांक ०५/०६/२०२५ पासून नाशिक परिमंडळातील ज्या जिल्हयात अर्ज करावयाचा आहे त्या जिल्ह्यातील **राज्य स्तर** जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालये, (नाशिक/धुळे) व जिल्हा परिषद स्तर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, (नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगांव/अहमदनगर) यांचे कार्यालयात स्वीकारण्यात येईल व अंतिम दिनांक १३/०६/२०२५ सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत समक्ष व पोष्टाने स्विकारले जातील.

अर्ज स्वीकारण्याचा दिनांक व वेळ खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | विहीत कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करण्याचा कालावधी | दि.०५/०६/२०२५ ते दि. १३/०६/२०२५ |

**टिप** - मुलाखती बाबत सुचना तसेच पात्र उमेदवारांची यादी मुलाखतीचे स्थळ दिनांक व वेळ यात होणारे बदल संबंधित जिल्हयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केले जातील.

(डॉ.कपिल आहेर)
उपसंचालक आरोग्य सेवा,
नाशिक मंडळ, नाशिक.

स्थाळ-
दिनांक /०६/२०२५

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

जिल्हास्तरीय निवड समिती,द्वारा जिल्हा शल्य चिकित्सक,कार्यालय व जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक/धुळे/नंदुरबार/जळगांव/अहमदनगर

## अर्जाचा नमुना

**वैद्यकिय अधिकारी, गट-ब, बी.ए.एम.एस., (B.A.M.S.) यांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरणेसाठी इच्छुक उमेदवारांने भरावयाच्या अर्ज नमुना**

१) उमेदवाराचे संपूर्ण नांव (आडनाव प्रथम):- ----------------------------------------------------------------

२) जन्म तारीख (DD/MM/YYYY) / / अर्जदाराचे दिनांक १३/०६/२०२५ पर्यंत वय --- वर्ष---महिने--- दिवस-----

३) शैक्षणिक अर्हता - बी.ए.एम.एस.

१) बी.ए.एम.एस. पदवी उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नांव---------------------------------------------

२) पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नांव ---------------------------------------------

४) एम.एम.सी./एम.सी.आय.एम. येथे नोंदणी केल्याचा दिनांक.-----------------------------------------------------

५) पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदवी अर्हताधारक असल्यास विषय-----------------------------------------------

६) बी.ए.एम.एस. परिक्षेतील गुण खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकुण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

७) शासकिय निमशासकिय संस्थेत काम केल्याचा अनुभव असल्यास कालावधी.

अनुभवाचा तपशिल-

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नांव | पद | एकुण कालावधी वर्ष महिना दिवस | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

८) पत्रव्यावहाराचा पत्ता -------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क क्रमांक / मोबाईल नं. ----------------------------------ई-मेल आयडी-----------------------------------

९) कायमचा पत्ता----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

संपर्क क्रमांक / मोबाईल नं. ----------------------------------ई-मेल आयडी-----------------------------------

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणिक करतो/करिते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहील.

**ठिकाण:-** ---------------------------

**दिनांक:-**    /    /२०२५

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

खालीलप्रमाणे प्रमाण पत्र साक्षांकित करुन अर्जासोबत जोडलेले आहेत. (जोडलेल्या प्रमाणपत्रांना ( ) टिक करावी.

१) जन्म तराखेचा पुरावा/L.C./एस.एस.सी.प्रमाणपत्र

२) बी.ए.एम.एस. उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक व प्रमाणपत्र

३) एम.सी.आय.एम. नोंदणी व नुतणीकरण केल्याचे प्रमाणपत्र (M.C.I.M.)

४) पदव्युत्तर पदवी/पदविका गुणपत्रक व प्रमाणपत्र

५) अतिरिक्त शैक्षणिक अर्हतेचे नोंदणी प्रमाणपत्र

६) अनुभव असल्यास दाखला-प्रमाणपत्र